# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.०७ दिनांक १५/०१/२०२१

## वाणगांव पोलीस ठाणे येथे दाखल खुनाच्या गुन्हयातील आरोपीस शिताफिने अटक

मयत महिला वय ३२ वर्ष, ही तिचे परिवारासोबत वाणगांव येथे राहत होती. ती बोईसर एमआयडीसी मध्ये कामास असतांना ०६ वर्षापुर्वी आरोपीत याचे बरोबर तिची ओळख होऊन त्यांचे प्रेम संबध निर्माण झाले. आरोपी हा तिचे घरी अधुन मधुन येत होता. मयत हिने त्याला सोन्याची चैन, अंगठी दिली. ते लग्न करणार असल्याने दिनांक २१/१०/२०२० रोजी मयत ही आरोपीत याचे बरोबर बोईसरला लग्नाचे सामान खरेदी साठी जाते असे सांगुन गेली. ती पुन्हा परत आली नाही. तिला तिचा भाऊ व इतर नातेवाईकांनी फोन केले असता आरोपीत याने तिच्या मोबाईल वरुन तिच्या नातेवाईकांना ती सुखरुप असुन वापीला असल्याचे मॅसेज केले. परंतु त्याने फोन वरुन बोलण्यास टाळाटाळ केली. मयत हिच्या भावाने त्यांचा शोध घेतला असता आरोपी हा बोईसर एमआयडीसी मध्ये मिळुन आला. त्यास त्याने बोईसर पोलीस स्टेशनला नेले असता त्याने मयत ही वापीला असल्याचे सांगितले. त्याचे सांगणेप्रमाणे मयत हिचा भाऊ व इतरांनी आरोपीत याचेसह खाजगी गाडीने वापीला जाऊन मयत हिचा शोध घेत असतांना तेथुन आरोपीत पळुन गेला म्हणुन फिर्यादी यांनी बोईसर पोलीस ठाणे येथे तक्रार दिली. श्री.विश्वास वळवी, उपविभागीय पोलीस अधिकारी बोईसर विभाग, श्री.प्रदिप कसबे, प्रभारी अधिकारी, बोईसर पोलीस ठाणे, पोलीस उपनिरीक्षक श्री.योगेश खोंडे यांनी सदर प्रकरणी वैयक्तिक लक्ष घालुन आरोपीत यास ताब्यात घेवुन त्याचेकडे कसुन चौकशी केली असता आरोपी याने मयत हिचा खुन केल्याची कबुली दिली. फिर्यादी यांनी दिल्या फिर्यादी वरुन आरोपीत याचे विरुध्द वाणगांव पोलीस ठाणे गु.र.नं. I ०५/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दाखल गुन्ह्याचा तपास सहा.पोलीस निरीक्ष श्री. श्रीकांत शिंदे हे करीत आहे.

सदरची कारवाई श्री. दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक पालघर यांचे सुचनेप्रमाणे श्री.विश्वास वळवी, उपविभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.प्रदिप कसबे, प्रभारी अधिकारी,बोईसर पोलीस ठाणे, पोलीस उपनिरीक्षक श्री.योगेश खोंडे यांनी केली आहे.

Scanned with CamScanner